पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- 2022-2023

## सांस्कृतिक विभाग

**प्राचार्य**
डॉ. एस. आर .टकले

**विभाग प्रमुख**
डॉ. मंजुषा नळगीरकर

**सहाय्यक**

डॉ. नितीन माळेगावकर

# श्री संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## सांस्कृतिक विभाग

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष 2022 - 2023

**सांस्कृतिक विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2022 - 2023 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.**

| |
|---|
| **स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पथनाट्याचे सादरीकरण** |
| **जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम.** |
| **व्याख्यान कार्यक्रम.** |
| **केंद्रीय युवक महोत्सव सहभाग .** |
| **वार्षिक स्नेहसंमेलन** |

- **स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पथनाट्याचे सादरीकरण**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित सांस्कृतिक विभागाच्या वतीने लढा स्वातंत्र्याचा हे पथनाट्य दिनांक 14 ऑगस्ट 2022 रोजी फुलंब्री गावातील मध्यवर्ती ठिकाणी (बस स्टॅन्ड, टी पॉईंट, तहसील ऑफिस) सादर करण्यात आले. सदरील पथनाट्यात बीए बीकॉम बीएससी च्या दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ज्यात आरती केजभट, प्राजक्ता इंगळे, प्रतीक्षा लोहिया, आकांक्षा शिरसागर, पुनम दाभाडे, उर्मिला ढोके, ऋषिकेश अंभोरे, अनिल डांगर, चंद्रमणी बनसोडे व पवन मैंद यांचा सहभाग होता. फुलंब्री च्या तहसीलदार डॉ. शितल राजपूत या स्वतः पथनाट्य पाहण्यासाठी उपस्थित राहिल्या व पथनाट्य बद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## • जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम •

ज्या व्यक्तींनी समाज व देशासाठी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने 21अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. ज्यात

| अ.क्र | **दिनांक** | **कार्यक्रम** |
|---|---|---|
| 1 | 23/7/2022 | लोकमान्य टिळक जयंती |
| 2 | 01/08/202 | अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर पुण्यतिथी |
| 3 | 27/7/2022 | श्री. संत सावता महाराज पुण्यतिथी |
| 4 | 3/8/2022 | क्रांतिसिंह नाना पाटील जयंती |
| 5 | 13/8/2022 | श्री रावसाहेब पाटील दांडगे पुण्यतिथी |
| 6 | 20/8/2022 | राजीव गांधी जयंती |
| 7 | 7/9/2022 | राजे उमाजी नाईक जयंती |
| 8 | 15/10/2022 | डॉ. ए पी जे अब्दुल कलाम जयंती |
| 9 | 14/11/2022 | पंडित नेहरू जयंती |
| 10 | 15/11/2022 | बिरसा मुंडा जयंती |
| 11 | 19/11/2022 | इंदिरा गांधी जयंती |
| 12 | 06/12/2022 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन |
| 13 | 12/01/2023 | राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती |
| 14 | 23/1/2023 | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती |
| 15 | 15/2/2023 | संत सेवालाल महाराज जयंती |
| 16 | 23/03/2023 | शहीद दिन |
| 17 | 11/04/2023 | महात्मा फुले जयंती |
| 18 | 14/04/2023 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती |
| 19 | 22/4/2023 | महात्मा बसवेश्वर जयंती |
| 20 | 30/4/2023 | संत तुकडोजी महाराज जयंती |

## • <u>व्याख्यान कार्यक्रम</u>●

- **श्री संत सावता महाराज पुण्यतिथी** – दिनांक 27 जुलै 2022 रोजी सावता महाराज पुण्यतिथी निमित्त संत शिरोमणी सावता महाराज या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रवचनकार श्री. मधुकरराव मुळे हे लाभले होते. त्यांनी सावता महाराजांच्या कर्मयोगी भक्तीवर विचार मांडले. तसेच त्यांच्या विचारांची आज समाजाला किती गरज आहे हे आपल्या वक्तव्यातून पटवून दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले यांनी भूषविले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

- **साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी :-**

  दिनांक 1 ऑगस्ट 2022 रोजी "अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक : जीवन व कार्य" या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुधाकर जाधव संचालक संकल्प क्लासेस फुलंब्री हे लाभले होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यकृतींची समीक्षा केली तसेच लोकमान्य टिळकांच्या प्रखर राष्ट्रवादावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले यांनी भूषविले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

- **अल्पसंख्याक हक्क दिवस :-**

  महाविद्यालयातील संस्कृतीक विभागाच्या वतीने दिनांक 18 डिसेंबर 2022 रोजी अल्पसंख्यांक हक्क दिवस निमित्त व्याख्यान पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ. संजिवकुमार पांचाळ सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की अल्पसंख्यांकांचे हक्क अबाधित राहावेत ही सर्व समाजाची जबाबदारी आहे. सामाजिक स्थिरता निर्माण करायची असेल तर सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. त्यांनी असेही प्रतिपादन केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहाल केलेल्या संविधानानुसार सर्व समाज घटकांनी कार्य करावे.  यावेळी अध्यक्षस्थानी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर तसेच सहाय्यक डॉ. नितीन माळेगावकर हे उपस्थित होते. सदरतील कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व  प्राध्यापक सहभागी झाले होते.

- **राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती :-**

  दिनांक 13 जानेवारी 2023 रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. संजय गायकवाड महात्मा फुले कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय पिशोर हे लाभले होते.त्यांच्या वक्तव्यात त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊंनी शिवबाला कसे घडवले. एक आदर्श माता म्हणून त्यांचे विचार किती प्रगल्भ होते यावर अधीक भर दिला. स्वामी विवेकानंदांचे विचार तरुण पिढीला प्रोत्साहन देणारे, जीवनाला दिशा देणारे व प्रेरक आहेत हे त्यांनी अनेक उदाहरणांवरून विद्यार्थ्यांशी संवाद साधून स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले यांनी भूषविले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## • केंद्रीय युवक महोत्सव सहभाग •

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दिनांक 16 ते 19 ऑक्टोबर 2022 दरम्यान केंद्रीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात महाविद्यालयाच्या संघाने 14 कलाप्रकारांमध्ये 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट सादरीकरण केले. सहभागाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

| अ.क्र | नाव | वर्ग | सहभागी कलाप्रकार |
|---|---|---|---|
| 1 | नंदा जयलाल राजपूत | BAFY | सुगम गायन, लावणी व लोकगीत |
| 2 | राजेश्वरी रामेश्वर गायकवाड | BSCSY | प्रश्नमंजुषा, पोस्टर व मुकाभिनय |
| 3 | आरती गवनाजी केज भट | BSCSY | वर्क्तृत्व, वादविवाद व प्रश्नमंजुषा |
| 4 | चंद्रमणी संजय बनसोडे | BCOMSY | काव्यवाचन, वादविवाद व मुकाभिनय |
| 5 | अनिल इंदल डांगर | BCOMSY | फोटोग्राफी व मुकाभिनय |
| 6 | प्रियांका मारुती ढेपले | BSCSY | चित्रकला व रांगोळी |
| 7 | आकांक्षा अशोक क्षीरसागर | BASY | मृदूमूर्ती कला व लोकगीत |
| 8 | राधा रमेश मिसाळ | BCOMFY | लावणी, लोकगीत व मुकाभिनय |
| 9 | रामेश्वर दगडू पठाडे | MCOMSY | प्रश्नमंजुषा |
| 10 | विजय संतोष घोडके | BCOMFY | शास्त्रीय तालवाद्य |

| | |
|---|---|
| 1-4 | शास्त्रीय तालवाद्य, सुगम गायन, लावणी व लोकगीत. |
| 2-1 | मुकाभिनय |
| 3-4 | प्रश्नमंजुषा, वर्क्तृत्व, वादविवाद, काव्यवाचन, |
| 4-5 | पोस्टर, चित्रकला, रांगोळी, मृदूमूर्ती कला व फोटोग्राफी |

## • वार्षिक स्नेहसंमेलन •

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक 6 ते 8 फेब्रुवारी 2023 दरम्यान पार पडले. दिनांक 7 फेब्रुवारी 2023 रोजी सायंकाळी संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या 11 विद्यार्थ्यांनी संगीत रजनी मध्ये 5 इव्हेंट सादर केले.

| अ. क्र | कलाप्रकार | सहभागी मुले |
|---|---|---|
| 1 | व्यसनाधीनता (मुकाभिनय) | चंद्रमणी बनसोडे, अनिल डांगर, आरती केजभट व राधा मिसाळ |
| 2 | उदे ग अंबे उदे (गोंधळ) | अश्विनी नाईक, पूजा प्रधान, प्रतीक्षा लोहिया, अश्विनी गंगावणे व कावेरी देवतकर |
| 3 | हरे कृष्ण हरे (शास्त्रीय नृत्य) | नंदा राजपूत |
| 4 | दरिया किनारे एक बंगलो (कोळीगीत) | कल्याणी नाईक व अश्विनी नाईक |
| 5 | उडी उडी जाय (गरबा नृत्य) | अश्विनी नाईक |

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

## सांस्कृतिक विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे

- **स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त "लढा स्वातंत्र्याचा" पथनाट्याचे सादरीकरण**





फुलंब्रीच्या तहसीलदार डॉ. शितल राजपूत पथनाट्य पाहिल्यावर विचार व्यक्त करताना



## ● जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम ●



**लोकमान्य टिळक जयंती**



**श्री. संत सावता महाराज पुण्यतिथी**



**अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर पुण्यतिथी**



क्रांतिसिंह नाना पाटील जयंती



श्री रावसाहेब पाटील दांडगे पुण्यतिथी



राजीव गांधी जयंती



राजे उमाजी नाईक जयंती



डॉ. ए पी जे अब्दुल कलाम जयंती



पंडित नेहरू जयंती



बिरसा मुंडा जयंती



इंदिरा गांधी जयंती



डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन



राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती



नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती



संत सेवालाल महाराज जयंती



शहीद दिन




महात्मा फुले जयंती




डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती



**महात्मा बसवेश्वर जयंती**




**संत तुकडोजी महाराज जयंती**

**श्री संत सावता महाराज पुण्यतिथी -दिनांक – 27 जुलै 2022**




सावता महाराज पुण्यतिथी निमित्त संत शिरोमणी सावता महाराज या विषयावर प्रवचनकार श्रीमधुकरराव मुळे . . सावता महाराजांच्या कर्मयोगी भक्तीवर विचार मांडले .व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते

**दिनांक 1 ऑगस्ट 2022 :- साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी:-**






"अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक जीवन व कार्य :" या विषयावर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन .

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉसुधाकर जाधव .- संचालक, संकल्प क्लासेस, फुलंब्री हे लाभले होते

महाराष्ट्र टाइम्स

## श्री संत सावता माळी कॉलेजात कार्यक्रम

**फुलंब्री** : येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख व्याख्याते संचालक, संकल्प क्लास, फुलंब्री डॉ. सुधाकर जाधव यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. डॉ. सुधाकर जाधव म्हणाले, 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक या दोघांनीही सामाजिक क्रांती करण्यासाठी आपली लेखणी सुरू ठेवली. त्यात लोकमान्य टिळक यांनी स्वराज्य मिळवण्यासाठी तर अण्णा भाऊ साठे यांनी स्वराज्यातील भांडवलशाही व्यवस्थेतील सामाजिक अन्यायाविरुद्ध लेखणी चालवली.' अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्रा. नितीन माळेगावकर यांनी आभार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

**अल्पसंख्याक हक्क दिवस**




**दिनांक 18 डिसेंबर 2022 रोजी 'अल्पसंख्यांक हक्क दिवस' निमित्त व्याख्यान पर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक डॉ. संजिवकुमार पांचाळ  सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

**दिनांक 13 जानेवारी 2023 रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती.**



.




**‘राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची प्रासंगिकता’ या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. संजय गायकवाड**



## ● केंद्रीय युवक महोत्सव सहभाग ●

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दिनांक .16 ते 19 ऑक्टोबर 2022 दरम्यान केंद्रीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते ज्यात महाविद्यालयाच्या संघाने .14 कलाप्रकारांमध्ये 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट सादरीकरण केले. सहभागाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.




शोभा यात्रा






**पोस्टर स्पर्धा**



**चित्रकला स्पर्धा**



**प्रश्न मंजुषा स्पर्धेत सहभागी विद्यार्थी**





**सुगम गायन  स्पर्धा**



लावणी स्पर्धा







## मुकाभिनय स्पर्धा






**वादविवाद स्पर्धा**






**वर्क्तृत्व स्पर्धा**




**काव्यवाचन स्पर्धा**




**लोकगीत स्पर्धा**

## • वार्षिक स्नेहसंमेलन •




**दरिया किनारे एक बंगलो (कोळीगीत) - कल्याणी नाईक व अश्विनी नाईक**



**दरिया किनारे एक बंगलो (कोळीगीत) - कल्याणी नाईक व अश्विनी नाईक**



उडी उडी जाय (गरबा नृत्य) - अश्विनी नाईक




उडी उडी जाय (गरबा नृत्य) - अश्विनी नाईक




हरे कृष्ण हरे (शास्त्रीय नृत्य) - नंदा राजपूत




हरे कृष्ण हरे (शास्त्रीय नृत्य) - नंदा राजपूत



**उदे ग अंबे उदे (गोंधळ)** - अश्विनी नाईक, पूजा प्रधान, प्रतीक्षा लोहिया, अश्विनी गंगावणे व कावेरी देवतकर




**उदे ग अंबे उदे (गोंधळ)** - अश्विनी नाईक, पूजा प्रधान, प्रतीक्षा लोहिया, अश्विनी गंगावणे व कावेरी देवतकर



**व्यसनाधीनता (मुकाभिनय) - चंद्रमणी बनसोडे, अनिल डांगर, आरती केजभट व राधा मिसाळ**

सकाळ



फुलंब्री : येथील सावता माळी महाविद्यालयात गुणवंतांच्या सत्कार प्रसंगी महाविद्यालय सदस्य योगेश मिसाळ, प्रा.डॉ.अनिरुद्ध मोरे, प्राचार्य एस.आर. टकले आदी.(छायाचित्र : नवनाथ इधाटे, फुलंब्री)

# सावता माळी महाविद्यालयात स्नेह संमेलनाची सांगता

**फुलंब्री, ता.९(बातमीदार) :** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात स्नेह संमेलनाची उत्साहात सांगता झाली.

यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ.अनिरुद्ध मोरे, प्राचार्य, डॉ.एस. आर. टकले, माजी प्राचार्य, डॉ.प्रदीप जब्दे, महाविद्यालय विकास समिती सदस्य योगेश मिसाळ, विद्यार्थी संसद सचिव चंद्रमणी बनसोडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी ``गुणवंत खेळाडू पुरस्कार'' कु.उषा जाधव हिला देण्यात आला. यासोबतच सांस्कृतिक विभागातील युवक महोत्सव व स्नेह संमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. तर राजेंद्र कोलते विद्यार्थ्याला सावता भूषण पुरस्कार देण्यात आला. यावेळी पुरस्काराचे अभिवाचन विद्यार्थी संसद समितीचे समन्वयक प्रा.विजय पांडे यांनी केले. महाविद्यालयातून बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. या विद्याशाखांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थ्यांचा सत्कार व स्वागत करण्यात आले.

**गुणवंतांचा सत्कार**

यावेळी उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार'' सतीश जमधडे, चंद्रमणी बनसोडे, ऋतुजा अंभोरे यांना देण्यात आला. ``उत्कृष्ट वाचक पुरस्कार'' ऋतुजा लोहिया, राजेश्वरी गायकवाड यांना तर प्रा. डॉ.संजीवकुमार पांचाळ यांना ``युनिव्हर्सल टॅलेंट एज्युकेशन अवॉर्ड'' मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रा.डॉ.नितीन माळेगावकर यांना पीएचडीबद्दल सत्कार करण्यात आला.

Aurangabad, District-Today
10/02/2023 Page No. 3